साप्ताहिक कमलाभवानी

# संदेश

करमाळा तालुक्याचे लोकप्रिय मुखपत्र...

वर्ष 31 वे

| www.saptahiksandesh.com | kamalabhavanisandesh@gmail.com

| परखड अग्रलेख | वस्तुनिष्ठ बातम्या
विविध सदरे | करमाळेकरांची खास ओळख

संस्थापक संपादक : डॉ.ॲड.बाबूराव हिरडे
संपादक : सौ.उषादेवी बाबूराव हिरडे
वेताळ पेठ, करमाळा, जि.सोलापूर, मो.९४२३३३७४८०

नं.७०४९७/९८ (दिल्ली) | पोस्ट परवाना PPR/01/2021-2023 | वर्षे ३३ वे | अंक क्र.१३५ | पाने-१६ | दि.२८/७/२०२३ | दर शुक्रवारी प्रसिध्द | किंमत ३ रु.




# तालुका शंभर टक्के बागायत होण्यासाठी उजनी-कुकडी योजना राबविणार : आ.शिंदे

करमाळा : करमाळा तालुका शंभर टक्के बागायत होण्यासाठी उजनी-कुकडी योजना आपण राबविणार असून त्यासाठी पाटबंधारे विभागाने हिरवा कंदील दिला आहे; अशी माहिती आमदार संजयमामा शिंदे यांनी दिली आहे.

आ.शिंदे यांच्या ३१ जुलै रोजी असलेल्या वाढदिवसानिमित्त सा.संदेशशी ते बोलत होते. पुढे बोलताना आ.शिंदे म्हणाले, की उजनी-कुकडी या योजनेत कुकडीचे पाणी करमाळा तालुक्याला मिळण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव दिलेला आहे. या प्रस्तावास शासनाने अनुकूलता दाखवली असून उजनी-कुकडी या योजनेत कुकडीचे पाणी करमाळा तालुक्यासाठी २५ हजार हेक्टर क्षेत्रासाठी मंजुर आहे. हे पाणी कॅनॉलद्वारे न देता उजनीत सोडून उजनीतून ते पाणी वाशिंबे येथून उचलून पोंधवडी चारीत (बोगदा) सोडून तेथून ते पाणी कुकडी जुन्या कालव्याद्वारे मांगी तलावात तसेच जातेगाव पर्यंत दिले जाणार आहे. दुसऱ्या टप्प्यात केतूर येथून उजनीचे पाणी उचलून चारी क्र.१९४ (किमी) येथे कुकडी चारीत पाणी सोडायचे आहे. तेथून कालव्याद्वारे ते पाणी तालुक्यातील शेतीला दिले जाणार आहे. याबाबतचा सर्वे पाटबंधारे विभागाने केला असून तसा अहवाल शासनाला सादर केला आहे. त्यानुसार ही योजना सुप्रमो मध्ये घेण्याचे ठरले आहे. ही योजना लवकरात लवकर कार्यान्वीत करून तालुक्यातील २५ हजार हेक्टर क्षेत्राचा पाण्याचा प्रश्न कायम सुटणार आहे. दहिगाव उपसा सिंचन योजनेच्या अपूर्ण कामासाठी ११६ कोटी रूपयाचा प्रस्ताव दिलेला त्याची वर्क ऑर्डरही निघालेली आहे. (पान २ वर)

- २५.१५ योजना : ५० कोटी निधी
- ग्रामीण रस्तेसाठी : २५ कोटी
- थेट अनुदान : १० कोटी
- समाजकल्याणसाठी : ५ कोटी रू.



असा निधी मंजूर झाला आहे. गेल्या नऊ महिन्यात एक रूपयाचेही अनुदान मिळालेले नाही. अजितदादा पवार उपमुख्यमंत्री झाल्यानंतर तातडीने अनुदान मिळाले असून विविध विकासकामांना मान्यता मिळाली असून गती मिळाली आहे.
...आ.संजयमामा शिंदे



राजकारणात फेरबदल होतातच नाहीतर ते कसले राजकारण

## संपादकीय.....................................!

# वेध माढा लोकसभेचे !

देशात भाजपाची सत्ता कायम राहण्यासाठी व पुन्हा नरेंद्र मोदीना पंतप्रधान करून हॅटट्रीक करण्यासाठी भाजपाकडून सर्व प्रकारचे प्रयत्न सुरू आहेत. दक्षिणेत भाजपाला थारा मिळत नसल्याने उत्तरप्रदेश व महाराष्ट्रावर भाजपा हायकमांडने पुर्ण लक्ष केंद्रीत केले आहे. लोकसभेला महाराष्ट्रातून किमाण ४० व जास्तीजास्त ४५ खासदार निवडून आणायचे हे धोरण आखून वाटचाल सुरू आहे. शिवसेना व राष्ट्रवादी हे दोन पक्ष फोडून मोजके आमदार आपल्याजवळ करण्याचे धोरण विधानसभेसाठी नाहीतर त्यांना लोकसभेसाठी जवळ केले आहे. हे उघड सत्य आहे. त्यामुळे राज्यातील प्रत्येक लोकसभा मतदार संघावर भाजपाच्या वरीष्ठ नेत्यांची नेमणूक करून त्यांच्याकडून कायम लेखाजोखा घेऊन, नेमके काय करायला पाहिजे याचा अंदाज सुरू आहे.

सद्य स्थितीत माढा लोकसभा मतदारसंघ हा तर भाजपाचा असून येथे रणजितसिंह नाईक निंबाळकर हे खासदार आहेत. त्यामुळे या मतदारसंघाला आबाधित ठेवण्यासाठी भाजपाचे विशेष नियोजन असल्याबाबत बोलले जाते. खरंतर माढा मतदारसंघ हा भाजपाकडून निसटणार असल्याचे भाजपाच्या सर्व्हेत स्पष्ट झाले आहे. गेल्या चार वर्षात माढा मतदारसंघाबाबत भाजपाने तीन सर्व्हेकेले त्यात भाजपाला अनुकूल वातावरण दिसलेले नाही. ज्या मतदारसंघात भाजपाला अडचणी आहेत, तेथे भाजपाने ,,लोकसभा प्रवास योजना ,,आखत केंद्रीय मंत्र्याकडे त्याची जबाबदारी दिली आहे. त्यानुसार माढा मतदारसंघाची जबाबदारी केंद्रीय गृहराज्यमंत्री अजयकुमार मिश्रा यांच्यावर दिलेली आहे.

माढा लोकसभा मतदारसंघांची निर्मिती सन २००८ साली झाली. यामध्ये सोलापूर जिल्ह्यातील करमाळा,माढा,सांगोला व माळशिरस हे चार विधानसभा मतदारसंघ तर सातारा जिल्ह्यातील फलटण व माण हे दोन मतदार संघ समाविष्ठ आहेत. सुरवातीलाच या मतदार संघात राष्ट्रवादीचे संस्थापक व माजी केंद्रीय कृषीमंत्री शरद पवार उभे राहिले होते. त्यावेळी त्यांच्या विरुध्द भाजपाने माजीमंत्री सुभाष बापू देशमुख यांना उभे केले होते. त्यावेळी राष्ट्रीय समाजपक्षाचे अध्यक्ष महादेव जानकर हे सुध्दा उभे होते. त्यावेळी श्री.पवार हे तब्बल तीन लाख २६ हजार ४५९ विक्रमी मतांनी विजयी झाले. त्यावेळी श्री.पवार यांना ५ लाख ३० हजार ५९६ मते तर श्री. देशमुख यांना २ लाख १६ हजार १३७ मते मिळाली तर श्री. जानकर यांना ९८ हजार ९४६ मते मिळाली होती.

सन २०१४ च्या माढा लोकसभा मतदारसंघात पुन्हा राष्ट्रवादीने बाजी मारली होती. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील हे होते. तर महायुतीने स्वाभीमानीसाठी जागा सोडली होती, त्यात स्वाभिमानीकडून सदाभाऊ खोत हे होते. श्री. मोहिते-पाटील यांना ४ लाख ८९ हजार ९८९ मते मिळाली तर श्री. खोत यांना ४लाख ६४ हजार ६४५ मते मिळाली. प्रतापसिंह मोहिते-पाटील (अपक्ष) यांना२५,१८७ तर बसपाचे कुंदन बनसोडे यांना १५ ७९० मते मिळाली. यावेळी श्री.मोहिते-पाटील हे अवघ्या २५ हजार ५४४ मतांनी विजयी झाले होते.

सन २०१९ मध्ये झालेल्या निवडणुकीत भाजपाचे रणजितसिंह नाईक निंबाळकर यांना ५ लाख ८६ हजार ३१४ मते मिळून ते ८५७६४ मतांनी विजयी झाले तर राष्ट्रवादीचे उमेदवार संजयमामा शिंदे यांना ५ लाख ००५५० मते मिळाली होती तर वंचीत बहुजन आघाडीचे उमेदवार ॲड. विजयराव मोरे यांना ५१,५३२ पडली होती.

आगामी सन २०२४ च्या निवडणूकीसाठी वेगवेगळे अंदाज बांधले जात आहेत. त्यात राज्यात तीन आघाडीचे सरकार आहे. शिवसेना व राष्ट्रवादी हे भाजपासोबत दोन गट आहेत. माढा मतदार संघात राष्ट्रवादीचे अजितदादा पवार गटाचे वर्चस्व दिसून येते. करमाळ्याचे आमदार संजयमामा शिंदे, माढ्याचे आमदार बबनदादा शिंदे, फलटणचे आमदार दिपक चव्हाण व विधान परिषदेचे आमदार रामराजे नाईक निंबाळकर हे आहेत. दुसऱ्या बाजूला भाजपाकडे माळशिरस आमदार राम सातपुते,मान-खटावचे आमदार जयकुमार गोरे व विधानपरिषदेचे सदस्य रणजितसिंह मोहिते-पाटील हे तर शिवसेना (शिंदे गट) सांगोल्याचे आमदार शहाजीबापू पाटील हे आहेत. शहाजीबापू हे जिकडे बहुमत तिकडे जाणार हे ठरलेले आहे.

सन २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत मोहिते-पाटील परिवाराने भाजपामध्ये प्रवेश करत लोकसभेला माढा मतदार संघातून एक लाख मताचे मत्ताधिक्य देवू असे जाहीर केले व तसे जोरदार प्रयत्न केले. त्यात ते यशस्वी झाले व माळशिरस मतदार संघातून त्यांनी भाजपाला एक लाखाचे मत्ताधिक्य दिले. केवळ मोहिते-पाटील यांच्यामुळेच हा राष्ट्रवादीचा बालेकिल्ला असलेला मतदारसंघ भाजपाला जिंकता आला. त्याची परतफेड म्हणून भाजपाने रणजितसिंह मोहिते-पाटील यांना विधान परिषदेवर घेतले आहे. असे असलेतरी अलीकडे विद्यमान खासदार नाईक निंबाळकर व मोहिते-पाटील यांच्यात अंतर वाढलेले आहे. अजितदादा पवार यांनी भाजपा - बरोबर जाण्याच्या निर्णयानंतर आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील व आमदार रामराजे नाईक निंबाळकर हे एकत्र येत असल्याचे चित्र दिसते, एवढेच नाहीतर हा मतदारसंघ भाजपाकडून आजीतदादा गट आपल्या राष्ट्रवादीला मागण्याबाबत जोरदार फिल्डींग लावून आहे. तसे झाले नाहीतर विद्यमान खासदार यांना भाजपाकडून उमेदवारी मिळू नये असेही प्रयत्न सुरू असल्याची चर्चा आहे.

थोडक्यात भाजपाचे रणजितसिंह मोहिते-पाटील व आमदार राम सातपुते यांच्याशी नाईक निंबाळकराचे संबध चांगले राहिलेले नाहीत. त्यामुळे पवार लॉबीचे या मतदारसंघात वर्चस्व असल्याने ही जागा भाजपाकडून युतीत राष्ट्रवादी (अजीतदादा गट) यांना मिळण्याची जास्त संधी आहे. शिवसेना ठाकरे गट हे आघाडी बरोबर राहतील तर शरद पवार राष्ट्रवादी हे नेमके काय करणार हे अद्यापही गुलदस्त्यात आहे. दुसऱ्या बाजुला या मतदारसंघात राष्ट्रीय समाज पक्षाचे संस्थापक व राष्ट्रीय अध्यक्ष माजी मंत्री महादेव जानकर हे उभा राहणार असून त्यासाठी त्यांनी जनस्वराज्य यात्रा काढून अनेक गावांना भेटी दिल्या आहेत व जोरदार लॉबींग सुरू केले आहे. आपल्या समाजाची मोट बांधून ही निवडणूक लढवण्याचे धोरण श्री. जानकर यांचे असल्याचे स्पष्ट दिसत आहे. मोहिते-पाटील गटाचे नेते आमदार राणजितसिंह मोहिते-पाटील यांच्याही नावाचीही चर्चा आहे. तसेच राष्ट्रवादी एकसंघ असताना मे २०२३ मध्ये फलटण येथे मुधोजी क्लबवर विधानसभेचे माजी सभापती व विद्यमान आमदार रामराजे नाईक निंबाळकर यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त झालेल्या कार्यक्रमात राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी रामराजेंच्या उमेदवारीची घोषणा केली होती. दरम्यान त्यांचे बंधु संजीवबाबा निंबाळकर यांनाही लोकसभेसाठी उभे करणार असल्याची चर्चा आहे. काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष धवलसिंह मोहिते-पाटील यांच्या नावाचीही जोरदार चर्चा आहे.

एकंदरीत निवडणूका अवघ्या सात महिन्यावर येवून ठेपल्या आहेत. त्यामुळे सर्वच पक्षांची लगबग सुरू असताना माढा मतदार संघ हा महत्वाचा मतदारसंघ म्हणून ओळखला जातो. वरीष्ठ पातळीवर कोणाला उमेदवारी मिळणार हे सध्या सांगणे कठीण आहे. भाजपाच्या विद्यमान खासदाराबाबत जनसामान्यात असलेल्या प्रतिक्रिया पाहून व त्यांनी करमाळा, माढा, सांगोला व माळशिरस मतदार संघात किती दौरे केले, जनसामान्यासाठी किती कामे केली व जनसमुदायासाठी ठोस कामे किती केली यावर त्यांचे भवितव्य अवलंबून आहे. त्यामुळे आज ठाम सामना कोणा उमेदवारात होईल; हे आज सांगता येणार नाही. पण सर्वच पक्षाला माढा लोकसभा मतदार संघाचे वेध लागले आहेत हे मात्र नक्की..!

पान १ वरून पुढे...

## तालुका शंभर टक्के बागायत होण्यासाठी उजनी-कुकडी योजना राबविणार : आ.शिंदे

उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेताच पहिल्याच भेटीत करमाळा तालुक्यासाठी अभी अनुदान दिले आहे. दहिगाव योजनेसाठी ११६ कोटीच्या प्रस्तावास मंजुरी मिळालेली असून वर्क ऑर्डर निघाली आहे. जातेगाव–टेंभूर्णी या हायवे रस्त्यासाठी मान्यता मिळाली आहे. नगर ते जातेगाव पर्यंत रस्ता झाला आहे. तेथून जातेगाव ते टेंभूर्णी पर्यंत २८ मीटरच्या रस्ता डांबरीकरणासाठी मंजुरी मिळालेली आहे. साईडपट्ट्या व सर्व्हिस रोड वगळता हा रास्ता होणार आहे. या रस्त्याचे लवकरच टेंडर निघणार आहे.

त्यामुळे दहिगाव योजनेचे सर्व प्रश्न सुटणार आहेत. उन्हाळ्यामध्ये पाणी कमी पडू नये म्हणून दोन टप्प्यासाठी दोन जादा विद्युतपंप बसविण्यात येणार आहेत. यामुळे पाणी खाली गेले तरी दहिगाव योजनेसाठी पाणी कमी पडणार नाही. तसेच सर्व उपचारीची कामे करण्यात येणार असून दहिगाव योजना अद्ययावत करून ती चांगल्या पध्दतीने चालविण्यात येणार आहे.

करमाळा तालुक्यातील एमआयडीसी साठी सांगली येथे कार्यालय आहे. उद्योजकांची गैरसोय होवू नये म्हणून या कार्यालयाचे टेंभूर्णी व करमाळा एमआयडीसी साठी उपविभागीय कार्यालय सुरू करण्याची मागणी केली आहे. उजनी–कुकडी योजनेचे पाणी मांगी तलावात येणार असल्याने मांगी तलावातून एमआयडीसी साठी पाणी आणले जाईल. तसेच एमआयडीसीमधील प्लॉटच्या किंमती जादा आहेत. त्या कमी करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. या किंमती कमी झाल्यावर लवकरच करमाळा एमआयडीसी मध्ये उद्योग उभे राहतील. याशिवाय वीज, पाणी, रस्ते आदी सुविधा देण्यावरही लक्ष राहणार असून इतर वेगवेगळ्या योजना राबविण्यसाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे आ.शिंदे यांनी सांगितले.

## २८ जुलै पासून श्रीमद्‌भागवत कथा सुरू

करमाळा(सं.प्र.) : अधिक श्रावणाचे औचित्य साधत शहरातील सोहम महिला मंडळ आणि राशीनपेठ तरूण सेवा मंडळ यांचे वतीने २८ जुलै ते ३ ऑगस्ट या कालावधीत श्रीमद्‌भागवत कथेचे आयोजन करण्यात आले आहे. भावताचार्य श्री कौस्तुभजी(रामदासजी) महाराज (श्री संत वेणा स्वामी मठ, मिरज) यांच्या सुमधूर वाणीत दुपारी दोन ते सायंकाळी पाच पर्यंत दत्तपेठ येथील गुरूप्रसाद मंगल कार्यालयात हा धार्मिक कार्यक्रम २८ जुलै पासून सुरू झाला आहे.

सा.कमलाभवानी संदेश हे साप्ताहिक प्रकाशक, मालक, मुद्रक सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी संदेश प्रिंटर्स, वेताळपेठ, करमाळा येथे संपादक म्हणून सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी छापून तेथेच प्रसिध्द केले. (या अंकातील मजुकराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)


धर्मसंगीत
लॉन्स मंगल कार्यालय
सर्व सुविधायुक्त असे मंगल कार्यालय
करमाळा शहरात नव्याने सुरू
बुकींग सुरू आहे
आपल्या करमाळा तालुक्यातील सर्वात
भव्य लॉन्स मंगल कार्यालय
करमाळा शहरापासून १ कि.मी. अंतरावर
नागनाथ मंदिराजवळ, करमाळा-कर्जत रोडवर
सर्व सोयीसुविधायुक्त प्रशस्त लॉन्स, लग्न हॉल, जेवण हॉल
किचन, प्रशस्त पार्किंग असे
धर्मसंगीत लॉन्स मंगल कार्यालय सुरू होत आहे.
टीप : पॅकेज व्यवस्था देखील उपलब्ध असणार आहे.
उपलब्ध सुविधा
• एक हजार खुर्च्या, शंभर टेबल (लोखंडी)
• सहा रूम वधू-वर सह
• स्वयंपाक व जेवणाची भांडी
• ३५ केव्ही जनरेटर व साऊंड सिस्टीम
• वाय-फाय सुविधा, सर्वत्र सीसीटीव्ही निगराणी
• मंगल कार्यालयाचे लॉन्स एन्ट्रीला भव्य रोमन थीम डेकोरेशन सेट संपूर्ण लाईटींगसह
संपर्क : आबासाहेब आवटे परिवार (8888832011 / 9822600663 )


जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष
विठ्ठल कार्पोरेशनचे
चेअरमन व विकासप्रिय आमदार
मा.श्री.
संजय(मामा) शिंदे
आपणांस वाढदिवसाच्या
31 Jully
हार्दिक शुभेच्छा
श्री.राजेंद्र बारकुंड
(माजी उपाध्यक्ष, जि.प.सोलापूर)
शुभेच्छुक
डॉ.भूषण राजेंद्र बारकुंड (M.B.B.S)
श्री कोटलिंग बहुउद्देशीय समाजसेवी सह.संस्था, चिखलठाण
डॉ.भूषण राजेंद्रकुमार बारकुंड (एम.बी.बी.एस.मुंबई)
युवराज राजेंद्रकुमार बारकुंड

# मध्यान भोजन योजनेचा लाभ बांधकाम कामगारांनी घ्यावा : गणेश चिवटे



करमाळा(सं.प्र.) : पिंपळवाडी येथे बांधकाम कामगारांना मध्यान भोजन योजनेचा शुभारंभ करण्यात आला. या योजनेचा लाभ जास्तीत जास्त बांधकाम कामगारांनी घ्यावा; असे आवाहन भाजपाचे तालुका अध्यक्ष तथा सोलापूर जिल्हा नियोजन समिती सदस्य गणेश चिवटे यांनी केले आहे.

याबाबत माहिती देताना चिवटे म्हणाले, की उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त करमाळा तालुक्यातील अकरा गावातील बांधकाम कामगारांना मध्यान भोजन योजना सुरु करण्यात आली आहे. या योजनेनुसार बांधकाम कामगारांना दुपारचे जेवण (चपाती, भात, भाजी, लोणचे) त्यांच्या गावात मिळणार आहे. तरी याचा लाभ कामगारांनी घ्यावा. यावेळी भाजपाचे जिल्हा सरचिटणीस किरण बोकन, तालुका उपाध्यक्ष रामा ढाणे, दिपक गायकवाड, आतिष पाटील, वाशिंबेचे उपसरपंच अमोल पवार, नितीन झिंजाडे, गणेश महाडिक, पवार व बांधकाम कामगार उपस्थित होते.

### लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर मतदार पुर्नरिक्षण कार्यक्रम

# मतदारांच्या घरोघरी जाऊन नोंदी व दुरूस्ती होणार

करमाळा(सं.प्र.) : आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर आणि भारत निवडणूक आयोगाच्या संक्षिप्त पुर्नरीक्षण कार्यक्रमांतर्गत मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) घरोघरी भेट देऊन मतदारांच्या नावांची पडताळणी करणार आहेत. हा कार्यक्रम २१ जुलै ते २० ऑगस्ट या कालावधीत राज्यात राबविला जात असून, यासाठी करमाळा तालुक्यातील नागरीकांनी सहकार्य करावे; असे आवाहन प्रभारी तहसीलदार विजय जाधव यांनी केले आहे.

मतदान केंद्रस्तरीय अधिकारी आपल्या या भेटीमध्ये मतदारांचे वैयक्तीक तपशील, पत्ता आणि छायाचित्रांची पडताळणी करतील. मृत आणि स्थलांतरीत मतदार, दुबार नोंदणी असलेले मतदार, मतदारांचाही शोध घेतील. तसेच मतदार ओळखपत्रासोबत आधारकार्ड जोडण्याची प्रक्रिया करतील. यासोबतच नवीन मतदार, तृतीयपंथी आणि




विमुक्त जाती भटक्या जमातीतील मतदार, देहव्यवसाय करणाऱ्या महिला मतदारांचा शोध घेऊन त्यांची आणि मततदार यादीत नाव नसलेल्यांची नोंदणी करण्याचे कामही या काळात केले जाणार आहे. वयाची १८ वर्षे पूर्ण केली आहेत पण अजुनही मतदार नोंदणी केलेली नाही, अशांची मतदार नोंदणी करून घ्यावी. तसेच मतदार यादीतील आपले वैयक्तीक तपशील, पत्ता यात काही दुरूस्त्या असतील तर त्यासाठीचे अर्ज भरून द्यावेत. लग्नानंतर नाव बदललेल्या स्त्री मतदारांनी आपली नावे बदलून घ्यावीत; असे आवाहन जाधव यांनी केले आहे.

**प्रियंका आय केअर हॉस्पीटल** डोळ्याचा दवाखाना
डोळ्यांच्या आजारावरील निदान व उपचार केंद्र
उपलब्ध सुविधा..
- मोतीबिंदू, काचबिंदू, नासूर, तिरळेपणा, दृष्टिदोष वरील निदान व उपचार
- जपानच्या अत्याधुनिक मशीनव्दारे शास्त्रोक्त पध्दतीने तपासणी व उपचार
- फॅकोइमलसीफिकेशनी बिनटाक्याची मोतीबिंदूवरील शस्त्रक्रिया.
- सुसज्ज ऑपरेशन थिएटर
- जपानच्या अत्याधुनिक कॉम्प्युटरवर नेत्र तपासणी व चष्म्याचे नंबर काढण्याची सोय
- नेत्रपटल आजाराचे निदान व उपचार
- लेसर मशीनव्दारे लेन्स वरील जाळी काढण्याची सोय

डॉ.डी.बी.केमकर
(M.S.DOMS) नेत्ररोग तज्ञ
कन्सल्टिंग ऑफ्थॅलमोलॉजीस्ट व ऑफ्थॅलमिक सर्जन
पत्ता
पुणे रोड, त्रिमुर्ती कृशनचा वरचा मजला, करमाळा.
मो.9423222266, 9604762600
वेळ : सकाळी १० ते ६ (सोमवार ते शनिवार)

अत्याधुनिक प्रकारची लेझर सुविधा उपलब्ध ! (Nd YAG LASER) रविवारी बंद
सिध्दीविनायक ऑप्टीकल्स (आमच्याकडे शास्त्रोक्त पध्दतीने बनविलेले अचूक नंबरचे चष्मे अर्जंट बनवून मिळतील)
पत्ता : बसस्थानक शेजारी, बँक ऑफ इंडिया समोर, करमाळा.(9527268181 / 9860872619)

**ओजस हॉस्पिटल**
OJS HOSPITAL
AIIOPATHY AYURVED HOMEOPATHY
डॉ.रोहन रामदास कुंभार
B.A.M.S. M.D.(Acu) D.G.O. स्त्रीरोग तज्ञ
डॉ.मनोज रामदास कुंभार
M.D. कन्सलटींग फिजीशियन
डॉ.सौ.अंजली रोहन कुंभार
B.H.M.S. होमिओपॅथिक कन्सलटंट
वेळ : सकाळी ८ ते रात्री ८
२४ तास अत्यावश्यक सेवा
डॉ.सौ.सायली मनोज कुंभार
Nutritionist & Dietitian आहारतज्ञ
ॲलोपॅथी, आयुर्वेद होमिओपॅथी शास्त्रांच्या संयुक्त चिकित्सा पध्दतीने खालील आजारांवर अचूक निदान व योग्य उपचार • हृदयरोग व उच्च रक्तदाब • मधुमेह • थायरॉईड • संधिवात • पोटाचे आजार • स्त्रियांचे आजार • श्वसनसंस्थेचे आजार • मणक्यांचे व हाडांचे विकार • मुतखडा • मुळव्याध • सौंदर्य समस्या • त्वचारोग व केशविकार • आहारविषयक मार्गदर्शन • सुवर्णप्राशन संस्कार (दर महिन्यातील पुष्य नक्षत्रास)
उपलब्ध सुविधा : ECG, Multipara Monitor, Nebulisation(वाफेची सुविधा)
Glucometer (रक्तातील साखर तपासणी), प्रकृतीपरिक्षण, नाडीपरिक्षण, सुवर्णबिंदू प्राशन(जन्मापासून ते १६ वर्षा पर्यंत)
PAP SMEAR LBC, HPV DNA PCR, VILI & VIA Screening Test
(गर्भाशय मुख कर्करोग पूर्व तपासणीसाठी पुणे येथील नामांकीत लॅब गोलविलकर मेट्रोपोलिसशी संलग्नित)
पत्ता : केकीज केक शॉपच्या वरच्या मजल्यावर, सुभाष चौक, मेनरोड, करमाळा.
• संपर्क : 9960334005, 9423333950

# गुळसडी येथील जि.प.शाळेच्या संरक्षक भिंतीचे भुमीपूजन



करमाळा(सं.प्र.) : गुळसडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या संरक्षक भिंतीचे भुमीपूजन भारतीय जनता पार्टीचे तालुका अध्यक्ष गणेश चिवटे यांचे हस्ते करण्यात आले. जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून गुळसडी जिल्हा परिषद शाळेच्या संरक्षक भिंतीच्या बांधकामासाठी तीन लाख रूपये निधी मंजूर झाला होता. यावेळी बोलताना श्री.चिवटे यांनी तालुक्यासाठी विकासनिधी आणण्यासाठी आपण प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. यावेळी भाजपाचे तालुका उपाध्यक्ष रामा ढाणे, गणेश महाडिक, विनोद महानवर, गुळसडीचे सरपंच प्रमोद भंडारे, माजी सरपंच समाधान यादव, उपसरपंच योगेश भंडारे, ग्रा.पं.सदस्य महावीर कळसे, मारूती जाधव, आदम शेख, नारायण भोसले, पोलीस पाटील धनंजय अडसुळ, माजी उपसरपंच नवनाथ यादव, माजी सरपंच अनंत यादव, माजी ग्रा.पं.सदस्य तानाजी खंडागळे, बापू मोहोळकर, सामाजिक कार्यकर्ते सतीश बागल, शाम पडवळे, पप्पू बागल, राज भंडारे, शुभम लोंढे व ग्रामस्थ उपस्थित होते.

# करमाळा नगरपरिषद, करमाळा.

## जाहीर प्रसिध्दीकरण

करमाळा नगरपरिषद हद्दीतील मालमत्ताधारक प्रत्येक भोगावटदार व त्यांचे हित संबंधित यांना या सूचनेद्वारे कळविण्यात येते की, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नागरी अधिनियम १९६५ चे कलम १५० अ नुसार सन २०२३-२४ चे कराची मागणी बिल वाटप करण्यात येत आहेत. अद्याप ज्या नागरीकांना नजरचुकीने मागणी बिल मिळाले नाही त्यांनी नगरपरिषद कार्यालयात संबंधित विभागाशी त्वरीत संपर्क साधावा अन्यथा सर्व नागरीकांना मागणी बिले मिळाली असे गृहित धरले जाईल तसेच कलम १५० अ प्रमाणे ९० दिवसांच्या आत मागणी बिलाची रक्कम न भरल्यास सदर रकमेवर २% प्रमाणे दरमाह शास्ती (दंड) आकारण्यात येईल. तसेच मागील थकबाकी बिलाची मुदत संपल्यामुळे त्यावर दरमहा २% प्रमाणे शास्ती (दंड) आकारण्यात आलेली आहे. याबाबत नागरीकांनी नोंद घ्यावी तरी नागरीकांनी मुदतीत कराचा भरणा करून नगरपरिषदेस सहकार्य करावे..!

मुख्याधिकारी
करमाळा नगरपरिषद, करमाळा.

## सतीश नीळ यांचे सार्वजनिक बांधकाम मंत्री यांना निवेदन

# तालुक्यातील तीन प्रमुख मार्गांना राज्य मार्गाचा दर्जा द्यावा




करमाळा(सं.प्र.) : करमाळा तालुक्यातील दळणवळणाच्या दृष्टीने महत्वाच्या असलेल्या कुंभेज फाटा – पारेवाडी – जिंती चौक ते डिकसळ ते भिगवण तसेच कुगाव – शेटफळ – जेऊर – साडे व कोळगाव – निमगाव (ह), वरकुटे – घोटी ते जेऊर या तीन जिल्हा प्रमुख मार्गांना राज्य मार्गाचा दर्जा द्यावा; अशी मागणी मकाई साखर कारखान्याचे संचालक सतीश नीळ यांनी केली आहे. याबाबत नीळ यांनी सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण यांना निवेदन दिले आहे.

निवेदनात नीळ यांनी म्हटले आहे, की पुणे, सोलापूर व धाराशिव जिल्ह्यांना जोडणारे हे प्रमुख मार्ग आहेत. त्यामुळे या मार्गावरून मोठ्या प्रमाणावर वाहतूक होत असते. हे मार्ग सीना–कोळगाव व उजनी लाभक्षेत्रालगत असल्यामुळे परिसरात ऊस, केळी, पपई यास इतर अन्य फळपिकांचे उत्पन्न मोठ्या प्रमाणावर घेतले जाते. त्यामुळे हा परिसर फ्रुट व शुगर बेल्ट म्हणून ओळखला जातो. तसेच या परिसरात आठ ते दहा साखर कारखान्यांची ऊस वाहतूक याच मार्गावरून होते. या परिसरातील समृध्दीसाठी कृषी क्षेत्राला व्यावसायिकदृष्ट्या सबळ करण्यासाठी व विस्तीर्ण उजनी जलाशयातील पक्षी निरीक्षक, कृषी पर्यटन, मत्स्य अभ्यास केंद्र, वनस्पती अभ्यास केंद्र, नौकाविहार, जलपर्यटनाला चालना देण्यासाठी या मार्गाला राज्य मार्गाचा दर्जा देऊन विकसित करणे गरजेचे आहे. सदर निवेदनाच्या प्रती सार्वजनिक बांधकाम विभाग, कार्यकारी अभियंता अकलुज, अधिक्षक अभियंता सोलापूर यांना दिल्या आहेत.


**शिष्टमंडळासह मुख्यमंत्र्यांना भेटणार**

करमाळा तालुक्यातील रस्ते, पाणी, वीज, सिंचन, आरोग्य, रखडलेली औद्योगिक वसाहत, मांगी तलाव, जातेगाव–टेंभूर्णी रस्ता, पुनर्वसनाचे रखडलेले प्रश्न, नवीन शर्त व देवस्थान जमिनीचे प्रश्न, रेल्वे संदर्भातील प्रश्न, गायरान जमीन अतिक्रमण, केळी संशोधन केंद्र, लघु पशुचिकित्सालय, बसस्थानक अशा विविध समस्यांबाबत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्याकडे बागल गटाचे नेते, प्रमुख पदाधिकारी यांच्या नेतृत्वाखाली पुढील महिन्यात करमाळा तालुक्यातील शिष्टमंडळ जाणार असल्याची माहिती सतीश नीळ यांनी दिली.

खुशखबर मुळव्याधवर ट्रीटमेंटसाठी नको नगर–बारामती–सोलापूर खुशखबर



बार्शी येथील सुप्रसिध्द मुळव्याध तज्ञ
डॉ.विकास देविदास नागरगोजे (एम.एस.मुंबई)



आता आपल्या करमाळ्यात !

बार्शी
धन्वंतरी मुळव्याध सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल
कोर्ट समोर, करमाळा–परांडा बस स्टॉप, बार्शी.
मो.९७६७८९९५७१

टीप..
१. प्रत्येक ओपीडी दिवशी १० रूग्णांची तपासणी करण्यात येईल.
२. येताना जुन्या आजाराची फाईल घेऊन येणे.
३. इंजेक्शनचा निर्णय डॉक्टरांचा राहील.
४. तपासणी अगोदर नावनोंदणी अनिवार्य.
५. परगावच्या रूग्णांनी आदल्या दिवशी फोन करावा.

उपलब्ध सुविधा...
- मुळव्याधवर इंजेक्शन
- डिलीव्हरीनंतर उद्भवारे कोंब
- एकदा ऑपरेशन करून पुन्हा उद्भवणारे कोंब
- संडासवाटे रक्त येणे, पु येणे
- संडासची जागा बाहेर पडणे
- संडास जागी खाज व आग होणे
- संडासाचा नागवेडा
- संडास नंतर बसण्यास त्रास होणे
- भगंदर, फिशर
- चार प्रकारचे मुळव्याध (४ प्रकारचे इंजेक्शन)

करमाळा
दर गुरूवार व सोमवार
वेळ : सकाळी ९.०० ते १२.००
स्थळ : सावंत हॉस्पीटल मेनरोड, सावंत गल्ली, करमाळा.
संपर्क : मो.7057675589 7350632138

परिचय
डॉ.विकास देविदास नागरगोजे
मुळव्याध तज्ञ
पदवी : नाशिक
पदवोत्तर : मुंबई



• नांवनोंदणीसाठी संपर्क : मो.9405675887

# पांडे ग्रामपंचायतीच्या उपसरपंच पदी आजिनाथ शिंदे

करमाळा(सं.प्र.) : पांडे, धायखिंडी, खांबेवाडी ग्रुप ग्रामपंचायतीच्या उपसरपंच पदी नारायण पाटील गटाचे आजिनाथ शिंदे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. यावेळी सरपंच शीतल अनारसे, ग्रामपंचायत सदस्य संदिपान दुधे, शिवाजी भोसले, माजी सरपंच अनिता मोटे, माजी उपसरपंच नितीन निकम, वर्षा लांडगे, सुकेशिनी खटके, मकाईचे संचालक बाळासाहेब अनारसे, ग्रामसेवक गणपत नायकुडे, महादेव वायकुळे, आबा टकले, विजयकुमार खटके, नवनाथ शिंदे, आजिनाथ वायकुळे, भाऊसाहेब गरड, भिवआप्पा वाघमोडे, बाळासाहेब मोटे, लखन खटके, जयराम दुधे, आण्णा गोसावी, दादा मुजावर, दिनेश मोहोळकर आदी उपस्थित होते. निवडीनंतर आजिनाथ शिंदे यांचा सत्कार करण्यात आला.






करमाळा-माढा विधानसभा मतदारसंघाचे
लोकप्रिय आमदार
३१ जुलै
मा.श्री.
संजयमामा शिंदे
वाढदिवसाच्या आभाळभर शुभेच्छा
माणूस कामाचा ..
आपल्या जिवाभावाचा...!
श्री.अशोक मधुसूदन काटुळे
मा.मुख्याध्यापक, आण्णासाहेब जगताप विद्यालय
सरपंच, ग्रामपंचायत शेलगाव(क)
शुभेच्छुक
ग्रामपंचायत, शेलगाव(क)
व ग्रामस्थ


चक्रव्यूहात
अभिमन्यू
जरी घेरला गेला तरी
आमचा
नेता मात्र
सर्वांनाच पुरून उरला..
करमाळा तालुक्याचे
रणझुंजार आमदार
मा.श्री.
संजयमामा शिंदे
आपणांस वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा!
सरपंच
भोजराज सुरवसे
अध्यक्ष, करमाळा तालुका राष्ट्रवादी काँग्रेस विधानसभा मतदार संघ
शुभेच्छुक
बिरूदेव मजुर सह.संस्था भोसे, ता.करमाळा.
राजकुमार भोजराज सुरवसे
(अध्यक्ष)


सर्व सुविधायुक्त
शिवतीर्थ
मंगल कार्यालय
उपलब्ध सुविधा...
• 60 x 150 लग्नाचा हॉल
• 400 माणसांची एकावेळेस जेवणाची सोय
• पीओपी असलेल्या सहा रूम (वॉशरूम अ‍ॅटॅच)
• स्वयंपाक व जेवणाची भांडी उपलब्ध
• खुर्ची व सतरंजी उपलब्ध
• सीसीटीव्ही कॅमेराच्या कक्षेत
• 20 KV चे जनरेटर व साऊंड सिस्टीम
• प्रशस्त पार्किंग व भरपूर झाडी
बुकींग
सुरू आहे
संपर्क
श्री.दत्ताभाऊ भुजबळ
9960395395
पत्ता : करमाळा-पुणे रोड, विहाळ, ता.करमाळा.

# काँग्रेसच्या तालुका उपाध्यक्ष पदी छगन मोहोळकर



करमाळा(सं.प्र.) : अखिल भारतीय काँग्रेस आय कमिटीच्या तालुका उपाध्यक्ष पदी मोरवड येथील छगन मोहोळकर यांची तर ओबीसी विभाग काँग्रेस आय च्या तालुका संघटक पदी वाशिंबे येथील भगवान डोंबाळे यांची निवड करण्यात आली आहे.

छगन मोहोळकर यांनी काँग्रेस आयचे तालुका अध्यक्ष प्रताप जगताप यांच्या नेतृत्वाखाली नारायण पाटील गटाला सोडचिठ्ठी देऊन काँग्रेस मध्ये प्रवेश केला आहे. मोरवड गावामध्ये युवक कार्यकर्ता म्हणून मोहोळकर यांचे काम चांगले असून शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष म्हणून त्यांनी चांगले काम केले आहे. त्यांचे संघटन कौशल्य बघून प्रताप जगताप यांनी त्यांची काँग्रेस आय च्या तालुका संघटक पदी निवड केली. निवडीनंतर मोहोळकर व डोंबोळे यांचा फेटा बांधून व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना मोहोळकर म्हणाले, की लहानपणापासून आपणास सामाजिक कार्याची आवड आहे. समाज–कारणातून लोककल्याणासाठी राजकारण करणे ही काळाची गरज असल्याने आपण त्यागाची व समर्पणाची भावना असलेल्या काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे. प्रताप जगताप यांचे नेतृत्वाखाली करमाळा तालुक्यात गाव तेथे काँग्रेसची शाखा व घर तेथे काँग्रेस कार्यकर्ते अशी भावना उराशी बाळगून काम करणार असल्याचे सांगितले.

यावेळी ओबीसी सेलचे तालुका अध्यक्ष गफुरभाई शेख, जिल्हा उपाध्यक्ष दस्तगीर पठाण, तालुका युवक काँग्रेसचे अध्यक्ष संभाजी शिंदे, अल्पसंख्यांक सेलचे तालुका अध्यक्ष जावेदभाई शेख, किसान सेलचे तालुका अध्यक्ष दादासाहेब कुदळे, काँग्रेस आयचे शहराध्यक्ष सुजय जगताप यांचेसह रमजान मुलाणी, साहिलभाई सय्यद, इकबाल शेख, महादेव कुदळे, अर्जुन मदने, सुलतान शेख, निकेश चव्हाण, नितीन चोपडे, नितीन चिंचकर आदी उपस्थित होते.

## करमाळा येथील रहिवासी असलेले
# रा.स्वं.से.संघाचे माजी सरकार्यवाह मदनदास देवी यांचे निधन



करमाळा(सं.प्र.) : करमाळा येथील रहिवासी असलेले व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे माजी सरकार्यवाह आणि अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे माजी संघटनमंत्री मदनदास देवी (वय–८१) यांचे बंगळुरू येथे नुकतेच निधन झाले. प्रकृती अस्वास्थामुळे देवी हे घरीच होते. गेल्यावर्षी हरीद्वार येथील पालमपूरच्या आयुर्वेद संस्थेत पंचकर्म आणि इतर थेरपीद्वारे त्यांचेवर उपचार करण्यात आले होते. राष्ट्रसेवेसाठी लहानपणापासून मदनदास देवी यांनी आपलं सर्वस्व वाहिले. अजीवन ब्रह्मचारी राहिलेले देवी यांनी संघ कार्यासाठी संपूर्ण जीवन व्यतीत केले. आयुष्यातील जवळपास ७० वर्षे त्यांनी संघाच्या प्रचार आणि प्रसारासाठी काम केलं. संघाकडून ते भाजपचे राजकीय निरीक्षक म्हणूनही कार्यरत होते. त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच करमाळ्यातील त्यांच्या नातेवाईकांसह शहरातील सामाजिक पटलावर दु:खाची छाया पसरली आहे. त्यांच्या मागे एक भाऊ, दोन भगिणी, पुतणे, भाचे असा परिवार आहे.

डॉ.नायकुडे यांचे डोळ्यांचा दवाखाना श्रीजय नेत्र रूग्णालय
डॉ.भाग्यश्री रामकृष्ण नायकुडे (नेत्रतज्ञ व शल्य चिकित्सक)
B.A.M.S.,M.S.(Shalakya-Netra) (Gold Medalist) Reg no.1-77199-A
करमाळा शहरामध्ये मोतीबिंदू (Cataract), डोळ्यांवरील पडदा(Pterygium) तिरळेपणा (Squint) यासारख्या डोळ्यांच्या सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया अत्याधुनिक मशिनद्वारे(फेको लेझर) व तज्ञ डॉक्टरांच्या मार्फत केल्या जातील.
वेळ : सोमवार ते शनिवार स.१०.३० ते सायं ७ (रविवार बंद) इमर्जन्सी सेवा उपलब्ध
श्रीजय ऑप्टिकल (सर्व प्रकारचे चष्मे तयार करून मिळतील.)
श्री कमलादेवी रोड, कृष्णाजीनगर, करमाळा. मो.९८३४०७१२१८, ९९२१०१३४९३

# अमेरिकेच्या विद्यार्थ्यांची किसान बायोगॅस प्रकल्पाला भेट



करमाळा(सं.प्र.) : कोर्टी येथील सुपुत्र धनंजय निळकंठ अभंग यांनी पुणे येथे व स्वत:च्या घरी जनावरांच्या शेणापासून व टाकाऊ वस्तूंपासून तयार केलेल्या किसान बायोगॅस प्रकल्पाला युनायटेड स्टेटस् ऑफ अमेरिका देशातील कॉलिफोर्निया येथील शांताक्रॉज विद्यापीठात शिकत असलेल्या फ्रासिशिश व लियारा या विद्यार्थ्यांनी नुकतीच भेट दिली व प्रकल्पाची माहिती घेतली. धनंजय अभंग यांच्या या प्रकल्पाला राष्ट्रपती पारितोषिक मिळाले आहे. हा प्रकल्प पर्यावरणपुरक व मृदा संवर्धन शेतकऱ्यांसाठी चांगला आहे. हे प्रकल्प ज्या ज्या ठिकाणी आहेत तेथे आपण भेट देणार असल्याचे सांगून प्रकल्पाबद्दल समाधान व्यक्त केले. यावेळी या विद्यार्थ्यांनी श्री छत्रपती शिवाजी हायस्कुल कोर्टी या प्रशालेला भेट दिली व विद्यार्थ्यांशी संवाद साधला. यावेळी बोलताना संस्थेचे चेअरमन डॉ.महेश अभंग यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले, की आपल्याला भावी आयुष्यात जगात कोठेही जाऊन करियर करावे लागते. या अमेरिकेच्या विद्यार्थ्यांपासून आपण प्रेरणा घ्यावी व इंग्रजी भाषेचा सराव करावा. जीवनात मोठे ध्येय ठेवावे व ते पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करावा. प्रास्ताविक मुख्याध्यापिका ज्योती चव्हाण–शिंदे यांनी केले. सुत्रसंचालन विज्ञान शिक्षक अरूण नाळे यांनी केले. यावेळी किसान बायोगॅसच्या मुख्य कार्यकारी अधिकारी वैष्णवी निळकंठ अभंग, बाळासाहेब अभंग, पांडूरंग अभंग, हेमलता साळुंके, प्रशालेचे सर्व शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते.

# संकेत कांबळे एमडी (मेडिकल) परीक्षा उत्तीर्ण



करमाळा(सं.प्र.) : येथील माजी वैद्यकिय अधिकारी डॉ.दिलीप बलभिम कांबळे यांचे सुपुत्र डॉ.संकेत दिलीप कांबळे हे बी.जे.मेडिकल कॉलेज पुणे येथून एमडी (मेडिकल) ही परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत. डॉ.संकेत कांबळे यांचे एमबीबीएस चे शिक्षण बी.जे.मेडिकल कॉलेज पुणे येथूनच झाले असून त्यांची बहिण डॉ.धनश्री दिलीप कांबळे ही सुध्दा दोन वर्षापूर्वी एम.एस (सर्जन) उत्तीर्ण झालेली आहे. त्यांनी या यशामागे आई–वडील यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभल्याचे सांगितले. एमडी परीक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल डॉ.संकेत कांबळे यांचे करमाळा तालुक्यातून अभिनंदन केले जात आहे.


रूपाली बॅटरी
EXIDE


बॅटरी व इन्व्हर्टर बजाज फायनान्स वर उपलब्ध
बॅटरी व इन्व्हर्टर विक्री व दुरूस्ती
प्रोप्रा : गौतम पोते
9890576219
8888219951
अनिकेत पोते
9130992627
एकवेळ अवश्य भेट द्या..!
• पत्ता : जामखेड रोड, करमाळा., जि.सोलापूर.

श्री गजानन अगरबत्ती
• सुगंधी अगरबत्ती • कापूर
• अत्तर • धूप • भीमसेन कापूर,
• विविध कलरची रांगोळी
• सर्व प्रकारचे लोबन,
• सर्व प्रकारचे पुजेचे साहित्य
योग्य दरात मिळेल !

पत्ता : वेताळपेठ, करमाळा., जि.सोलापूर
(प्रोप्रा : निखिल प्रदीप ढाळे, मो.8007255456)

# यशराज कास्यथाळी फुट मसाज सेंटर




**पायाला मसाज म्हणजे संपूर्ण शरीराला मसाज**




वेळ : सकाळी ९ ते रात्री १० पर्यंत

वात, पित्त आणि उष्णतेच्या त्रासाने बेजार आहात ? तर आजच भेट द्या..!

कांस्य वाटी विसरा आता आले.. कांस्य मसाज यंत्र !

**कांस्याच्या थाळीने मसाज का करावा..?**

- शरीरातील वातीचे प्रमाण कमी करण्यासाठी
- शरीरातील वाढलेली अतिरिक्त उष्णता कमी करण्यासाठी
- डोळ्याच्या स्नायुंना चालना मिळविण्यासाठी
- शरीरातील थकवा कमी होवून थंडावा वाढविण्यासाठी
- मधुमेहामुळे होणाऱ्या पायाच्या संवेदना कमी करण्यासाठी
- निद्रानाशाची समस्या आटोक्यात राहण्यासाठी
- पित्ताचा त्रास कमी करण्यासाठी
- गुडघेदुखी, टाचदुखी, कंबरदुखी अशा त्रासाचे प्रमाण कमी करण्यासाठी
- पायावरची सुज तसेच तळपायाला भेगा पडणे तसेच पायाची जळजळ होणे, अशा समस्या कमी करण्यासाठी
- व्हेरीकॉज व्हेन्स(Vericose Vains) वर उपयुक्त
- डोळ्याखालील काळेपणा व चेहऱ्यावरील काळे डाग कमी करण्यासाठी
- शरीरातील रक्तप्रवाह सुरळीत करण्यासाठी

**पत्ता : म.गांधी हायस्कुलच्या पाठीमागे, पुणे रोड, करमाळा.**

**संपर्क : मो.8380072334, 7796012086**





मा.श्री. राणादादा सुर्यवंशी
उपाध्यक्ष, दत्तकला शिक्षण संस्था,
स्वामी-चिंचोली (भिगवण)



मा.सौ.माया झोळ
सचिव, दत्तकला शिक्षण संस्था,
स्वामी-चिंचोली (भिगवण)



मा.प्रा. रामदास झोळ
संस्थापक अध्यक्ष, दत्तकला शिक्षण संस्था,
स्वामी-चिंचोली (भिगवण)

# Dattakala Shikshan Sanstha

NAAC Accredited | ISO Certified

Off Pune-Solapur Highway, Swami-Chincholi (Bhigwan), Tal-Daund, Dist-Pune-413130.
E-mail ID : secretarydkss@gmail.com | Website : www.dattakala.edu.in

## Dattakala College of Pharmacy
(Affiliated to Pune University, MSBTE Board)

| | |
|---|---|
| D.Pharm | DTE CODE PH6833 |
| B.Pharm | DTE CODE PH6833 |
| M.Pharm | DTE CODE PH6833 |

## Institute of Pharmaceutical Science & Research (For Girls)
(Affiliated to DBATU University, MSBTE Board)

| | |
|---|---|
| D.Pharm | DTE CODE PH6914(F) |
| B.Pharm | DTE CODE PH6914(F) |
| M.Pharm | DTE CODE PH6914(F) |

( Pharmaceutics, Pharmaceutical Chemistry, Pharmaceutical Quality Assurance, Regulatory Affairs, Pharmacognosy )

## Anusaya Institute of Pharmacy
(Affiliated to MSBTE Board,Mumbai)

| | |
|---|---|
| D.Pharm | DTE CODE PH6892 |

## Dattakala Institute of Pharmacy,Kettur
(Affiliated to MSBTE Board,Mumbai)

| | |
|---|---|
| D.Pharm | DTE CODE PH6977 |

## Dattakala Group Of Institution
(Affiliated to Pune University, MSBTE Board)

| | |
|---|---|
| BE & ME | DTE CODE EN6628 |
| Dip. Engg. | DTE CODE D6628 |
| MBA | DTE CODE MB6628 |
| MCA | DTE CODE MC6628 |

## Dattakala Group of Schools

**Dattakala International School & Jr.College**
(SSC Board, Day cum Residential School)
Swami-Chincholi, Bhigwan

**Dattakala International School**
(CBSE Board, Day cum Residential School)
Swami-Chincholi, Bhigwan

**Dattakala Ideal School & Jr.College**
(SSC Board) Kettur, Karmala

Hostel Facility, Bus Facily Available in The Campus For Boys & Girls

गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यास कटिबद्ध!

FOR MORE INFORMATION CONTACT :

| Dr.Vishal Babar | Prof.Amit Pondkule |
|---|---|
| 9075680865 | 9561152724 |
| 9673002929 | 9922051144 |

निसर्गरम्य हरित कॅम्पस



प्रथम

# पुण्यस्मरण

वडीलांच्या छायेविना
सर्वकाही वाटे अपूर्ण
कोणत्याही धनसंपत्तीने सुध्दा न होई
कधी ही पोकळी संपूर्ण ।
आपल्या पुण्य आत्म्यास शांती लाभो,
हीच आमची भावपूर्ण श्रध्दांजली ।।

आमचे वडील

## शिवैक्य. प्रकाश(भाऊ) गुरूलिंग झाडबुके

यांचे **प्रथम पुण्यस्मरण**

रविवार दि.३०/७/२०२३ रोजी दुपारी १२.०० वा. करण्याचे योजिले आहे.
तरी पुष्पांजली वाहण्यासाठी आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे !

**स्थळ : घोलपनगर, करमाळा.**

**टीप :** ह.भ.प.दत्ता महाराज नंदरगे(पोथरे) व त्यांचे सहकारी भजनी मंडळ यांचे सुश्राव्य हरिकिर्तन सकाळी १० ते १२ या वेळेत होणार आहे. त्यानंतर पुष्पांजली व महाप्रसाद होईल.

आपले नम्र

श्रीमती शोभा प्रकाश झाडबुके (पत्नी), श्री.बाळासाहेब प्रकाश झाडबुके (मुलगा)
श्री.प्रितम प्रकाश झाडबुके (मुलगा), सौ.भाग्यश्री प्रितम झाडबुके (सुन)
चि.शंभु प्रितम झाडबुके (नातू)

# आदिनाथ सक्षमपणे चालवून शेतकऱ्यांना न्याय द्या : ना.तानाजी सावंत

करमाळा (सं.प्र.) : सहकारी साखर कारखाना पूर्णपणे सक्षम पध्दतीने चालविण्यासाठी ऊस तोडणी यंत्रणा भरलेली असून प्रशासकीय संचालकांनी सर्व सभासद ऊस उत्पादक शेतकरी कर्मचारी यांना विश्वासात घेऊन अत्यंत चांगल्या पध्दतीने कारखाना चालू करून शेतकऱ्यांना न्याय द्यावा; असे मत आरोग्यमंत्री तथा आदिनाथ सह.साखर कारखान्याचे पालकत्व स्वीकारलेले प्रा.तानाजी सावंत यांनी व्यक्त केले.

पुणे येथे प्रशासकीय संचालक बाळासाहेब बेंद्रे, सदस्य महेश चिवटे, संजय गुटाळ यांनी ना.तानाजी सावंत यांची भेट घेऊन आदिनाथ कारखान्याच्या झालेल्या कामकाजाचा आढावा त्यांच्यासमोर मांडला. आदिनाथच्या कारभाराबद्दल ना.सावंत यांनी समाधान व्यक्त करून किमान पाच लाख टन ऊसाचे गाळप करून कारखान्याचे भवितव्य सुरक्षित करावे.

ऊस उत्पादक सभासदांनी सुध्दा हा आपला मालकीचा कारखाना आहे; हा उद्देश डोळ्यापुढे ठेवून क्रियाशील सभासद म्हणून कायमस्वरूपी राहण्यासाठी प्रत्येकाने या कारखान्याला ऊस द्यावा; असे आवाहन बाळासाहेब बेंद्रे यांनी केले आहे.

ऊस वाहतूक तोडणीचे करार भैरवनाथ शुगर आलेगाव व भैरवनाथ शुगर या मार्फत करण्यात आले आहे. सर्व कर्मचारी उत्साहाने व एकजुटीने कामकाज करीत असून कामकाजातील प्रगतीबद्दल बेंद्रे यांनी समाधान व्यक्त केले आहे. शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख प्रा.शिवाजी सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली यावर्षीच्या गाळपाचे नियोजन करण्यात आले असून आदिनाथ पूर्ण क्षमतेने चालू होणार असल्यामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यातून समाधान व्यक्त होत आहे.

# पीएसआय पदी निवड झालेले अक्षय पवार यांचा चिखलठाण ग्रामस्थांच्या वतीने सत्कार



करमाळा(सं.प्र.) : चिखलठाण गावचे रहिवासी लक्ष्मण गणपत पवार यांचे सुपुत्र अक्षय पवार यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोग मार्फत घेण्यात आलेल्या स्पर्धा परीक्षेतून पीएसआय पदी निवड झाली. त्याबद्दल चिखलठाण ग्रामस्थांच्या वतीने जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष राजेंद्र बारकुंड यांचे मार्फत अक्षय पवार यांचा भव्य नागरी सत्कार करण्यात आला. दरवर्षी शासकीय सेवेत निवड झालेल्या तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार श्री.बारकुंड आयोजित करतात. या कार्यक्रमास चिखलठाण सोसायटीचे चेअरमन विकास गलांडे, अर्जुन टिंगरे, रामचंद्र कळसाईत, बाळू कळसाईत व ग्रामस्थ उपस्थित होते. यावेळी बोलताना बारकुंड यांनी विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त प्रयत्न करून यश मिळवावे व गावाचा नावलौकीक करावा; असे आवाहन केले.

# आदिनाथ सहकारी साखर कारखान्याच्या रोलरचे पुजन

करमाळा(सं.प्र.) : श्री आदिनाथ सहकारी साखर कारखान्याचे रोलर पुजन पृथ्वीराज सावंत यांचे हस्ते करण्यात आले. भैरवनाथ शुगर ग्रुपच्या सहकार्याने हंगाम पूर्ण केला जाणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आदिनाथचे प्रशासक व तृतीय विशेष लेखापरिक्षक वर्ग - १ सहकारी संस्था (साखर) चे बाळासाहेब बेंद्रे हे होते. यावेळी प्रशासक मंडळाचे सदस्य महेश चिवटे, संजय गुटाळ, कार्यकारी संचालक अरूण बागनवर, मुख्य रसायनतज्ञ ए.आर.खाडे, मुख्य अभियंता के.आर.पाटील, उपअभियंता दिपक देशमुख, मुख्य शेती अधिकारी एस.आर.शिंदे, मुख्य अकौंटंट एस.टी.पोळ, उपअकौंटंट एस.एन.बोराडे, कार्यालयीन अधिक्षक मधुकर कदम आदी उपस्थित होते. रोलर पुजननंतर पृथ्वीराज सावंत म्हणाले, की आदिनाथ कारखाना चांगल्याप्रकारे चालावा यासाठी भैरवनाथ शुगर ग्रुप तर्फे सर्वतोपरी सहकार्य करणार आहे. २०२३-२४ हा हंगाम चालू करण्यासाठी लागणारे सर्व आर्थिक सहाय्य भैरवनाथ ग्रुप करणार आहे. यावेळी आदिनाथ कारखाना सक्षमपणे चालण्यासाठी ऊस उत्पादक सभासद, ऊसतोड वाहतूक ठेकेदार व कर्मचाऱ्यांनी आदिनाथ कारखान्याचा गळीत हंगाम यशस्वीपणे चालण्यासाठी सहकार्य करावे; असे आवाहन प्रशासकीय संचालक गुटाळ यांनी केले. यावेळी स्थापत्य अभियंता एस.के.अभंग, खरेदी अधिकारी यु.एच.पाटील, भांडारपाल एस.व्ही.काकडे तसेच सुरक्षा अधिकारी एस.जी.अनारसे उपस्थित होते. प्रास्ताविक कार्यकारी संचालक अरूण बागनवर यांनी केले. मधुकर कदम यांनी मानले.

# चव्हाण महाविद्यालयात ४१० एस.टी.पासचे वाटप




करमाळा(सं.प्र.) : विद्या विकास मंडळाचे सचिव विलासराव घुमरे, संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य मिलींद फंड, प्राचार्य डॉ.एल.बी.पाटील व कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य कॅप्टन संभाजी किर्दाक यांच्या मार्गदर्शनातून व म.राज्य परिवहन महामंडळ करमाळा यांच्या संयुक्त विद्यमाने येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयातील अकरावी व बारावी कला/वाणिज्य व विज्ञान वर्गातील ४१० मुलींना म.रा.अहिल्याबाई होळकर मोफत पास योजनेचे पास वाटप करण्यात आले. यावेळी उपप्राचार्य संभाजी किर्दाक, करमाळा आगारातील लिपिक रेश्मा शेख यांचे हस्ते काही विद्यार्थ्यांना प्रतिनिधिक स्वरूपामध्ये पासचे वाटप केले आहे. याप्रसंगी रेश्मा शेख यांनी मुलींना एस.टी.पास बाबतचे नियम व महत्व सांगितले. राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक प्रा.लक्ष्मण राख यांनी आपले मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक प्रा.हनुमंत भोंग यांनी आभार डॉ.हरिदास बोडके यांनी मानले.

# ललिता अभय येवले यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन



करमाळा(सं.प्र.) : मुळच्या करमाळा येथील व मुंबईस्थित असलेल्या ललिता अभय येवले (वय-६३) यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्यांचे मागे पती, दोन मुले, सुना, नातवंडे, दीर भावजया आदी परिवार आहे. त्यांचेवर मुंबई येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. सेवानिवृत्त पोलीस उपायुक्त अभय येवले यांच्या त्या पत्नी व ज्येष्ठ पत्रकार तथा स्वातंत्र्यसैनिक कै.शंकरराव येवले यांच्या स्नुषा होत्या.






# उद्योगपती भरत आवताडे यांचा वाढदिवस विविध उपक्रमाने साजरा





करमाळा(सं.प्र.) : उद्योगपती भरत आवताडे यांचा वाढदिवस विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. भैरवनाथ शुगर (विहाळ) चे कार्यकारी संचालक किरण तात्या सावंत यांनी आवताडे यांचे संपर्क कार्यालयात त्यांचा सत्कार केला. याप्रसंगी सुधाकर लावंड, नाना मोरे, अमोल परदेशी, अरूण टांगडे, डी.जी.पाखरे आदि मान्यवर उपस्थित होते. तसेच वीर चौक, वेताळपेठ येथील श्रीराम मंदिर जीर्णोध्दार समितीचे वतीनेही आवताडे यांचा श्रीराम मंदिरात सत्कार करण्यात आला. यावेळी मंदिराच्या नव्याने लावण्यात आलेल्या चौकटीचे पूजन त्यांचे हस्ते करण्यात आले. यावेळी श्रीराम मंदिराचे उर्वरित कामासाठी सहकार्य करण्याचे आश्वासन आवताडे यांनी दिले.

याप्रसंगी विजय देशपांडे, दर्शन कुलकर्णी, महेश परदेशी, विवेक इनामदार, बबन विंचू महाराज आदीजण उपस्थित होते. याबरोबरच करमाळा शहरात व गावोगावी श्री.आवताडे यांचे सत्कार कार्यक्रम संपन्न झाले. संपर्क कार्यालयात दिवसभर युवा कार्यकर्त्यांनी सत्कारासाठी मोठी गर्दी केली होती. या सर्वांचे आभार भरत आवताडे यांनी मानले.

## नवभारत स्कुल व ट्विंकलींग स्टार्स मध्ये स्व.मदनदास देवी यांना श्रध्दांजली अर्पण



करमाळा(सं.प्र.) : श्री गिरधरदास देवी प्रतिष्ठान संचलित नवभारत इंग्लीश स्कुल तसेच ट्विंकलींग स्टार्स या शाळांमध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे माजी सहकार्यवाह स्व.मदनलालजी देवी यांना श्रध्दांजली वाहण्यात आली. यावेळी स्कुलमधील सर्व शिक्षक वृंद, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# आ.शिंदे यांचा मुंबईत सोनवणे यांचे हस्ते वाढदिवस साजरा



करमाळा(सं.प्र.) : राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे जिल्हाध्यक्ष बाळकृष्ण सोनवणे यांनी आमदार संजयमामा शिंदे यांचा वाढदिवसानिमित्त मुंबईत खास सत्कार केला आहे. पावसाळी अधिवेशनानिमित्त आ.शिंदे मुंबईत होते. ही संधी साधत सोनवणे यांनी त्यांचा ३१ जुलै पूर्वीच वाढदिवस साजरा केला. आ.शिंदे हे वाढदिवस साजरा करीत नसल्याने वाढदिवसादिवशी ते तालुक्यात न थांबता बाहेरगावी जातात. त्यामुळे सोनवणे यांनी वाढदिवसापूर्वीच मुंबईत आ.शिंदे यांची भेट घेवून शाल, श्रीफळ, फेटा बांधून सत्कार केला आहे. यावेळी कात्रजचे उपसरपंच शंकर कवडे, डॉ.राहुल कोळेकर, लव्हेचे सरपंच विलास पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी सोनवणे यांनी जिंती, कात्रज, टाकळी, कोंढारचिंचोली, खातगाव, केत्तूर, कोर्टी आदी भागातील रस्ते चांगले करण्याची मागणी केली. त्यास शिंदे यांनी चांगला प्रतिसाद दिल्याचे सोनवणे यांनी सांगितले.



चिखलठाण (ता. करमाळा) : येथील प्रसिद्ध कोटलिंग मंदिर परिसराचे ड्रोन कॅमेऱ्याच्या साह्याने घेतलेले छायाचित्र.

# राणादादा सुर्यवंशी यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमाने साजरा



करमाळा(सं.प्र.): जनसेवा हीच खरी ईश्वर सेवा.. हे व्रत उराशी बाळगून काम करणारे दत्तकला शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष राणादादा सुर्यवंशी यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रम राबवून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

सुर्यवंशी यांच्या वाढदिवसानिमित्त स्वामीचिंचोली (भिगवण) येथील दत्तकला शिक्षण संस्थेमध्ये विविध प्रकारच्या रोपट्याचे वृक्षारोपण करण्यात आले. सामाजि बांधिलकीच्या भावनेतून कुरकुंभ (ता.दौंड) येथील अविश्री बालसदन अनाथ आश्रमातील मुलांना पावसाळी रेनकोट, जीवनावश्यक किराणा साहित्याचे वाटप करण्यात आले तसेच विद्यार्थ्यांच्या समवेत केक कापून मुलांना खाऊचे वाटप करण्यात आले. यावेळी दत्तकला शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रा.रामदास झोळ, सचिव माया झोळ, मुख्य प्रशासकीय अधिकारी डॉ.विशाल बाबर व संस्थेचे सर्व पदाधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. अनाथ बालकांच्या अंगी असलेल्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी श्रावणबाळ अनाथ आश्रम येथील मुलांना संगीत साहित्याचे व खाऊचे वाटप करण्यात आले. मानव सेवा हीच खरी ईश्वर सेवा मानून जीवनामध्ये काम करणाऱ्या राणदादा सुर्यवंशी यांनी वाढदिवसानिमित्त वृध्दांची तहान भागावी व त्यांना शुध्द पाणी मिळावे म्हणून वृध्दाश्रमाला २३० लिटरचा रेफ्रिजरेटर भेट देऊन फळांचे वाटप केले. तसेच इंदापूर येथील पिढीत महिला वर्करच्या मुलांसाठी चालविण्यात येत असलेल्या बालविकास केंद्र येथे शिकत असलेल्या मुलांना स्वच्छ पिण्याच्या पाण्याची सोय म्हणून दत्तकला शिक्षण संस्थे तर्फे २५ लिटरचा वॉटर प्युरिफायर भेट देण्यात आला तसेच मिठाईचे वाटप करण्यात आले. कन्हावागज (ता.बारामती) येथील निवासी मुकबधीर विद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी किराणा साहित्याचे वाटप करण्यात आले.

सदर कार्यक्रमप्रसंगी दत्तकला शिक्षण संस्थेचे प्रतिनिधी डॉ.सचिन बेरे, संदीप शहाणे, प्रा.जीवनकुमार सोडल, प्रा.प्रिती काळे, प्रा.विपुल त्रिवेदी, प्रा.स्नेहल जमदाडे, ज्योती झोरे, प्रा.पुजा बनसोडे, प्रा.रोहन जाधव, रियाज शेख, सोनाली बेलदार तसेच कर्मचारी उपस्थित होते.

# करमाळा बाजार समिती प्रारूप मतदार यादीचा कार्यक्रम जाहीर

## अंतिम मतदार यादी २१ ऑगस्टला प्रसिध्द होणार

करमाळा(सं.प्र.): करमाळा कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक मंडळ निवडणुकीसाठी राज्य निवडणूक प्राधिकरणाच्या वतीने निवडणूक प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. या बाजार समितीसाठी प्रारूप मतदार यादीचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. २१ ऑगस्ट रोजी बाजार समितीच्या निवडणुकीसाठी अंतिम मतदार यादी प्रसिध्द केली जाणार आहे.

माजी आमदार जयवंतराव जगताप यांच्या ताब्यात असलेल्या कृषी उत्पन्न बाजार समितीच्या माध्यमातून करमाळा तालुक्यातील राजकारण पुन्हा एकदा खवळून निघणार आहे. करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीसाठी प्रारूप मतदार यादी प्रसिध्द झाली आहे. या प्रारूप मतदार यादीवर आक्षेप, हरकती मागविण्यासाठी २८ जुलै ते ७ ऑगस्टचा कालावधी देण्यात आला आहे. प्रारूप मतदार यादीवर प्राप्त झालेल्या आक्षेप, हरकतीवर १४ ऑगस्ट पर्यंत निर्णय दिला जाणार आहे. २१ ऑगस्ट रोजी अंतिम मतदार यादी प्रसिध्द केली जाणार आहे. करमाळा बाजार समितीसाठी सप्टेंबर नंतर निवडणूक घेतली जाण्याची शक्यता आहे.

बाजार समितीच्या विद्यमान संचालक मंडळाची मुदत २ नोव्हेंबर पर्यंत आहे. तत्पूर्वी नवीन संचालक मंडळ अस्तित्वात येणे आवश्यक आहे. या बाजार समितीसाठी १८ संचालक निवडले जाणार आहे.

### प्रारूप मतदार यादीत २६१३ मतदार

करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीसाठी २ हजार ६१३ मतदारांचा समावेश असलेली प्रारूप मतदार यादी समितीने जिल्हा उपनिबंधक कार्यालयात सादर केली आहे. यामध्ये ग्रामपंचायत मतदार संघातील ८०७, व्यापारी मतदार संघातील २१४, हमाल व तोलार मतदार संघातील १२३, विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था (सोसायटी) मतदार संघातील १४६९ मतदारांचा समावेश आहे.

# चिखलठाण ते कुगाव रस्त्याच्या कामासाठी आमरण उपोषणाचा इशारा

करमाळा (सं.प्र.) : चिखलठाण ते कुगाव दरम्यान रस्त्याचे काम सार्वजनिक बांधकाम विभाग मार्फत गेल्या वर्षभरापासून चालू आहे. परंतु हे काम अद्याप पूर्ण झाले नाही. जे काम झाले आहे ते निकृष्ट दर्जाचे झाले आहे. या झालेल्या कामाची चौकशी करावी व उर्वरित राहिलेले काम त्वरीत चालू करावे; या मागणीसाठी चिखलठाण येथील प्रगतशील शेतकरी अविनाश मारूती सरडे, सचिन आनंदराव गावडे, शंकर रामचंद्र बोंद्रे व योगेश दत्तात्रय सरडे यांनी आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला आहे.

याबाबत त्यांनी तहसीलदार, सार्वजनिक बांधकाम विभाग व पोलीस निरीक्षक यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे, की चिखलठाण ते कुगाव रस्त्याचे काम गेल्या वर्षभरापासून चालु आहे. झालेले काम हे निकृष्ट दर्जाचे असून गेल्या वर्षभरापासून हे काम अपूर्ण असल्याने या भागातील नागरीकांना रस्त्येअभावी अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. या कामाच्या पाठपुराव्यासाठी व काम चांगले व्हावे; यासाठी आम्ही सार्वजनिक बांधकाम उपविभाग करमाळा, सार्वजनिक बांधकाम विभाग पुणे, सोलापूर, अकलुज येथील कार्यालयात जाऊन अधिकाऱ्यांना माहिती दिली आहे. तसेच लवकरात लवकर रस्त्याचे काम चांगल्या पध्दतीने करण्याची विनंती केली आहे. आठ दिवसात काम चालू करू; असे आश्वासन देऊनही अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष काम सुरु करण्यास कोणतीही कारवाई केली नाही. लवकर या रस्त्याचे काम चालू झाले नाहीतर २२ ऑगस्ट पासून सकाळी साडेअकरा वाजता तहसील कार्यालय करमाळा येथे आमरण उपोषण करु; असाही इशारा सरडे, गावडे व बोंद्रे यांनी दिला आहे.

**दुकान गाळा भाड्याने देणे आहे**

कृष्णाजीनगर भागातील श्री कमलादेवी रोडटच
एल.आय.सी. ऑफिस शेजारी असलेला १२०० स्क्वे.फुट हॉल
दुकान किंवा संस्था, अन्य ऑफिससाठी भाड्याने देणे आहे
संपर्क : मो.9421023895, 8421796630

**सा.कमलाभवानी संदेश वार्षिक वर्गणी**
**२०० रू. भरून वर्षभर घरपोच अंक मिळवा**

# डिकसळ-कोंढारचिंचोली नवीन पुलाच्या निविदा प्रस्तावास मंजुरी : आ.शिंदे



करमाळा(सं.प्र.): करमाळा तालुक्यातील पश्चिम भागातील तीन जिल्ह्याच्या सीमेवर असणारा ब्रिटिशकालीन डिसकळ पुल खचला आणि जड वाहतूक बंद झाली. सदर पुलाची किरकोल दुरूस्ती करून हलक्या वाहनांची वाहतूक सदर पुलावरून सुरु आहे. परंतू करमाळा तालुक्यासह तीन जिल्ह्याला जोडणाऱ्या पुलाचा प्रश्न महत्वाचा होता. त्यासाठी आ.शिंदे यांनी ५५ कोटी रूपयांची मंजुरी महाविकास आघाडी सरकारच्या कार्यकाळामध्ये मिळवली होती. सदर कामावरती नवीन सरकारने थगिती दिलेली होती. ती स्थगिती उठवून प्रत्यक्षात त्या पुलाचे कामकाज सुरू होण्याच्या दृष्टीने पुलाच्या३८ कोटी ६६ लाख ३१ हजार ४७० रूपयाच्या निविदा प्रस्तावास २६ जुलै रोजी महाराष्ट्र शासनाने मंजुरी दिली असल्याची माहिती आ.शिंदे यांनी दिली.

याविषयी जादा माहिती देताना आ.संजयमामा शिंदे म्हणाले, की डिकसळ पुलासाठी एकूण ५५ कोटी निधी मंजूर असून सदर पुलाला जोडणाऱ्या जोड रस्त्याचे काम उर्वरित निधीमधून केले जाणार आहे. त्याचे टेंडर नंतर निघणार आहे. डिकसळ पुलाचे काम विजय एस.पटेल शिरपूर, धुळे या कंपनीला मिळाले असून दोन वर्षामध्ये काम पूर्ण होणे अपेक्षित आहे.

# फिसरे ते कोळगाव रस्ता त्वरीत करा अन्यथा रास्ता रोको : संजय घोलप



करमाळा(सं.प्र.) : करमाळा तालुक्यातील पूर्व भागातील फिसरे ते कोळगाव रस्ता त्वरीत करा अन्यथा रास्ता रोको आंदोलन महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने करण्यात येईल; असा इशारा संजय (बापू) घोलप यांनी दिला आहे. पूर्व भागातील रस्त्याची अवस्था एवढी खराब आहे की तेथील नागरीक कसे ये.. जा.. करतात हेच विशेष संबंधित भागातील लोकप्रतिनिधीचे त्या संदर्भात दुर्लक्ष दिसते. रस्ता खराब असल्यामुळेच तेथील शेतकरी करमाळा बाजारपेठ ऐवजी परांडा बाजारपेठेत जातात. करमाळा तालुक्यातील शेतकरी बाहेर तालुक्यात गेला तर आपले व्यापारी कसे दुकाने चालवणार. त्यामुळेच लवकर रस्ता तयार करण्यात यावा अन्यथा तीव्र आंदोलन मनसेच्या वतीने करणार; अशी माहिती संजय घोलप यांनी दिली.

करमाळेकरांना
सुवर्णसंधी...!

करमाळा तालुक्यात प्रथमच सुरु
**कथ्थक**
**नृत्य क्लासेस**



- गांधर्व महाविद्यालय मंडळ, मुंबई परीक्षा सोय.
- टिळक महाराष्ट्र विद्यापीठ परीक्षा सोय.
- महिला व मुलींसाठी वेगळी बॅचेस.
- वयोगट पाच वर्षापासून पुढे असेल

पत्ता
नवभारत इंग्लीश मेडियम स्कुल
पुणे रोड, करमाळा. जि.सोलापूर

मार्गदर्शक शिक्षिका
कांचन पालकर
(कथक एम.ए.), पुणे.

संपर्क
8983350740
9834526373

## उमेद अभियानाने...
# अनिता चव्हाण यांचे जगणे बदलले !



उमेद अभियानमुळे साडे येथील सौ.अनिता मंगेश चव्हाण यांचे जगणेच बदलले असून केवळ घरगुती कामावर राहणाऱ्या अनितताई बँक सखी म्हणून काम करू लागल्या आणि त्याचबरोबर महिला समुहाच्या माध्यमातून ब्युटीपार्लर व शिवणकाम असे व्यवसायही करू लागल्या आहेत.

साडे येथील अनितताई चव्हाण याबाबत सांगत होत्या. त्या म्हणाल्या, माझे पती मजुरीने काम करत होते. त्यांच्या मजुरीवर माझे घर कसेतरी चालत होते. सन २०१८ साली महिला स्वयंसहाय्यता समुह गटाची स्थापना गावामध्ये करण्यात आली. त्यात मी जय महिला स्वयंसहाय्यता समुह स्थापन केला. घराच्या बाहेर न जाणारी मी महिलांसोबत गावात एकत्र कार्यक्रम घेऊ लागले. क्षितीज नवे–विश्वास नवा.. हे उमेद अभियानचे ब्रीद वाक्य माझ्या बाबतीत शंभर टक्के सत्य ठरले. मी बँक ऑफ इंडिया साडे शाखेत बँक सखी म्हणून काम करू लागले. बँकेतून समुहांना एक कोटी रूपयाच्या आसपास कर्ज वाटप केले. माझ्या समुहातून कर्ज घेऊन ब्युटीपार्लर व शिवणकाम हे व्यवसाय सुरू केले. त्यातून माझ्या परिवाराची प्रगती झालीच त्याबरोबरच माझ्या समुहातील महिलांचीही प्रगती झाली आहे. याकामी तालुका अभियान व्यवस्थापक योगेश जगताप, प्रभाग समन्वयक शिवराज खलिफे तसेच पोपट माने यांचेही मार्गदर्शन लाभले.

# एक निश्चय.., एक अंमलबजावणी !

एक मुलगा रस्त्याने जात असताना त्याने एका श्रीमंत व्यक्तीला पाहिले. त्याचे कपडे, गाडी, मोबाईल सर्वच काही त्याला विशेष वाटले आणि त्यानेही श्रीमंत होण्याचे ठरविले. त्यानंतर त्याने एक काम सुरू केले आहे. आणि त्या कामात तो पैसेही मिळवून लागला. खरंतर त्या कामात त्याचा चांगला जमही बसला होता. असे असताना रस्त्यात एक दिवस त्याला एक विद्वान व्यक्ती भेटले. या विद्वान व्यक्तीचे बोलणे ऐकून तो त्यांच्यावर आकर्षित झाला आणि आपणही असेच ज्ञानी बनले पाहिजे; असा विचार करू लागला. त्याबरोबर त्याचा पैशाचा मोह सुटला आणि ज्ञान मिळविण्यासाठी प्रयत्न करू लागला. अनेक ग्रंथ वाचू लागला. चांगल्या लोकांबरोबर चर्चा करू लागला. तो खरंतर ज्ञानी बनत असतानाच एका संगीत तज्ञाची व त्याची भेट झाली. संगीत तज्ञाचे संगीत ऐकून तो हरकून गेला आणि त्याला ज्ञानापेक्षा आपण संगीतात काम करूया.. असे वाटले आणि तो संगीत शिकु लागला. काही दिवस संगीतात काम केल्यानंतर त्याला एक दिवस एक राजकीय नेता भेटला आणि त्या राजकीय नेत्याचा प्रभाव त्याच्यावर पडला व तो नेता बनण्यासाठी प्रयत्न करू लागला. परंतु त्यातही त्याला यश आले नाही. तोपर्यंत त्याचे वय खूप वाढले होते. त्यानंतर तो एका महात्म्याला भेटला आणि आपले दु:ख सांगितले.

त्यावेळी महात्मा त्याला म्हणाला.. "**जीवनात जर काही करायचे असेलतर एक निश्चय व त्याचीच अंमलबजावणी करावी लागते. तर आणि तरच यश मिळते.**" त्यानंतर या युवकाने एकाच गोष्टीवर लक्ष केंद्रीत करून जीवन यशस्वी केले.

# आ.संजयमामा शिंदे करमाळा तालुक्यासाठी टर्निंग पॉईंट



विकास ही चिरंतन आणि निरंतर चालणारी प्रक्रिया असते. कोण्या एका लोकप्रतिनिधीने जादूची कांडी फिरवली आणि लगेच मतदार संघाचा कायापालट झाला असं कधीच घडत नसतं, परंतु मतदारसंघाच्या उभारणीसाठी ज्या काही पायाभूत सुविधा असतात त्या सुविधा निर्माण करण्यासाठी प्रयत्न करणे हे लोकप्रतिनिधींचे आद्य कर्तव्य असतं. विशेषत: रस्ते, पाणी आणि वीज याबाबतीत मुलभूत आणि भविष्यकालीन नियोजन डोळ्यापुढे ठेवून लोकप्रतिनिधींनी काम करणे अपेक्षित असतं. या निकषावरती आमदार संजयमामा शिंदे यांचे नेतृत्व अगदी कसोटीवरती उतरताना दिसते (कुकडी प्रकल्प, दहिगाव योजना, मांगी तलाव, कोळगाव प्रकल्प) पाणी आले म्हणजे प्रश्न सुटला असं नव्हेतर त्यासाठी वीजेची आवश्यकता आहे हे लक्षात घेऊन आमदार शिंदे यांनी अवघ्या तीन वर्षाच्या कार्यकाळामध्ये मतदारसंघात तीन नवीन सबस्टेशन बरोबरच आठ ॲडिशनल ट्रान्सफॉर्मर बसविण्याच्या कामाला प्राधान्य दिलेले आहे यावरून त्यांच्या दूरदृष्टीचा प्रत्यय यायला हरकत नाही. एवढ्यावरच न थांबता करमाळा तालुक्याच्या पूर्व भागामध्ये गौंडरे या ठिकाणी १३२ एमव्हीए क्षमतेचे मोठे सबस्टेशन होण्याच्या दृष्टीने त्यांनी पत्रव्यवहार केला असून त्याचे सर्वेक्षण शासकीय पातळीवर सध्या सुरू झालेले आहे.

रस्ते, पाणी, वीज याबरोबरच आरोग्य ही सुध्दा अतिशय महत्वाची बाब आहे. याबाबतीतही आमदार शिंदे यांची दूरदृष्टी आणि दूरगामी विचार दिसतो. करमाळा उपजिल्हा रूग्णालयाचे श्रेणीवर्धन करून त्यांनी ५० कॉट ऐवजी १०० कॉट उपलब्ध करून देण्यावरती भर दिला. एवढेच नव्हेतर त्यामध्ये २० कॉट हे अतिदक्षता विभागाचे असणार आहेत. एवढेच नव्हेतर डिजीटल एक्स रे मशीन, मोफत सिझेरियन सुविधा, अस्थिव्यंग दिव्यांगांना प्रमाणपत्र देण्याची व्यवस्था, आमदार स्थानिक विकास निधीमधून रूग्णवाहिका याबरोबरच जेऊर ग्रामीण रूग्णालय सुरू करणे, यासाठी स्टाफची नेमणूक करणे, करमाळा येथील अधिकारी व कर्मचारी विभाग यांच्या निवासासाठी १८ कोटी निधी मंजूर करून आणणे याबाबीमध्ये त्यांची दूरदृष्टी प्रत्ययाला येते.

करमाळा शहराच्या वैभवामध्ये भर घालण्याच्या दृष्टीनेही त्यांनी अचूक नियोजन केलेले असून सांस्कृतिक सभागृह बांधकाम, करमाळा नगरपरिषद इमारत बांधकाम आणि छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा उभा करण्यासाठी तब्बल १० कोटी निधीची तरतूद त्यांनी करून घेतली आहे. कमलाभवानी मंदिर हे करमाळा तालुक्याची ओळख व अस्मिता. या मंदिरासाठी पर्यटन विभागाकडून तब्बल ४ कोटी रूपयांचा निधी आमदार शिंदे यांनी मंजूर करून आणलेला आहे. या मंजूर निधीमधून मंदिराबरोबरच परिसराचाही चेहरामोहरा बदलण्यास मदत होणार आहे. कोर्टी ते आवाटी या रस्त्याचे पुर्णत्वास गेलेले काम तसेच टेंभूर्णी ते अहमदनगर या मार्गाचे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणकडे केलेले हस्तांतरण, भीमा नदीपात्रावर नव्याने उभारण्यता येणाऱ्या डिकसळ पुलाच्या कामाला ५० कोटी निधी मंजूर होऊन प्रत्यक्षात कामाला सुरूवातही झालेली आहे. या कामामुळे रस्ते विकासातही मोलाची भर पडलेली आपल्याला दिसून येते.

पाण्याच्या बाबतीतही संजयमामा शिंदे हे करमाळा तालुक्याचे आमदार झाल्यापासून सलग तीन वर्ष कोळगाव प्रकल्प १०० टक्के भरत आहे. हे हॅट्रीक करण्याचे रेकॉर्ड धरण पूर्णत्वास गेल्यापासून अद्यापपर्यंत घडलेले नव्हते. मांगी प्रकल्प दोन वेळेस ओव्हरफ्लो झालेला आहे. तालुक्यातील कोंढेज, कुंभेज, म्हसेवाडी, पारेवाडी यासारखे मोठे तलाव सातत्याने १०० टक्के भरल्यामुळे मोठ्या प्रमाणावर बारमाही पिकांची लागवड झाल्याचे आपल्याला दिसून येते. याचबरोबर दहिगाव उपसा सिंचन योजनेचे नियमित सुटणारे पाणी, कुकडी प्रकल्प अंतर्गत पोंधवडी या अपूर्ण चारीचे काम पूर्ण केल्यामुळे वाढलेले क्षेत्र, मांगी प्रकल्पातून सुटणारे पाणी, कोळगाव प्रकल्पातून देण्यात येणारे पाणी यामुळे तालुक्यामध्ये बागायती क्षेत्र मोठ्या प्रमाणावर झालेले आहे. दहिगाव उपसासिंचन योजनेच्या पट्ट्या मध्ये गुणवत्ता पूर्ण केळीचे विक्रमी उत्पादन तसेच विक्रमी भाव यामुळे लोकांच्या जीवनमानामध्ये राहणीमानामध्ये बदल झालेला आपल्याला ठळकपणे दिसून येतो. तालुक्यामध्ये मोठ्या प्रमाणावर ऊस पिकाचे क्षेत्र आहे. या ऊसाचे गाळप करण्यासाठी म्हैसगाव येथील विठ्ठल कार्पोरेशन लि; तसेच पांडे येथील विठ्ठल रिफाईंड शुगर या कारखान्यांनी शेतकऱ्यांना हातभार लावलेला आहे. तालुक्यातील शेतकऱ्यांच्या एकूणच समृध्दीला रस्ते, वीज, कारखानदारी आणि पाणी या बाबी महत्वाच्या असतात आणि प्रत्येक बाबीमध्ये आमदार संजयमामा शिंदे हे करमाळा तालुक्यासाठी टर्निंग पॉईंट ठरलेले आपल्याला दिसून येतात..!

**..डॉ.विकास वीर**


करमाळा तालुक्याचे विकासप्रिय आमदार
मा.संजय(मामा) शिंदे
आपणांस दि.३१ जुलै रोजी असलेल्या वाढदिवसास
हार्दिक शुभेच्छा !
खंबीर साथ
समर्थ साथ
सरपंच
उपसरपंच
श्री.सर्जेराव रिटे
सौ.लता किशोर रिटे
श्रीमती मंगल भिमराव ढवळे
श्री.किशोर सर्जेराव रिटे
शुभेच्छुक
ग्रामपंचायत रिटेवाडी, ता.करमाळा
सदस्य : रामहरी जगू पवार, तानाजी दत्तू पवार, ताई बापू पवार, बायडाबाई विष्णू खटके


जिल्हाध्यक्ष, राष्ट्रीय चर्मकार महासंघ
सोलापूर जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष
विठ्ठल कार्पोरेशनचे चेअरमन व
करमाळा तालुक्याचे विकासप्रिय
आमदार
मा.श्री.संजयमामा शिंदे
आपणांस वाढदिवसाच्या लाख.. लाख..
हार्दिक शुभेच्छा
श्री.बाळकृष्ण सोनवणे
शुभेच्छुक
मा.श्री.बाळकृष्ण सोनवणे (भाऊ) मित्र परिवार करमाळा तालुका

## वेगात मोटारसायकल चालविणाऱ्या प्रौढावर पोलीसांची कारवाई

करमाळा (सं.प्र.) : वेगात मोटारसायकल चालविणाऱ्या ४९ वर्षाच्या प्रौढावर पोलीसांनी कारवाई केली आहे. हा प्रकार २३ जुलैला सायंकाळी सव्वासात वाजता बसस्थानकाजवळ घडला आहे. या प्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल दिपक कांबळे यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की २३ जुलैला सायंकाळी सव्वासातच्या सुमारास बसस्थानकाजवळील संगमचौकात वाहतुकीचे नियमन करत असताना बबन उंबर चव्हाण(वय-४९, रा.आलेश्वर, ता.परांडा) हा मोटारसायकल वेगात वेडीवाकडी चालवत आला होता. त्याच्या या गाडी चालविण्याच्या कृत्यामुळे रस्त्यावरील लोकांच्या व जीवितास धोका होवू शकतो. त्यामुळे त्यास आडविले आहे. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील पोलीस उपनिरीक्षक प्रविण साने हे करत आहेत.

## विहिरीतील ४० हजार रू. किंमतीच्या सामानाची चोरी

करमाळा (सं.प्र.) : जेऊर येथील ग्रामपंचायतीच्या मालकीच्या पाणीपुरवठा करणाऱ्या विहिरीतील मोटार पॅनल बोर्ड आदी ४० हजार रूपये किंमतीच्या सामानाची चोरी झाली आहे. या प्रकरणी जेऊर ग्रामपंचायतीचे ग्रामविकास अधिकारी सलीमसाब फकीरसाब शेख यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की १९ जुलै पूर्वी जेऊर ग्राम ग्रामपंचायतीची दहिगाव येथील पाणीपुरवठा करणाऱ्या विहिरीतील पाईप, केबल, रस्सी व २० एचपीची पाणबुडी मोटार, पॅनल बोर्ड, लोखंडी पेटी असा ४० हजार रूपयाचा ऐवज चोरट्यांनी चोरून नेला आहे.

## मराठा मंदिरकडून मराठा महासंघाच्या पदाधिकाऱ्यावर गुन्हा दाखल

करमाळा(सं.प्र.) : मुंबई येथील मराठा मंदिर सार्वजनिक न्यास यांचे वतीने येथील मराठा महासंघाच्या चौघाजणांवर संगणमताने मराठा मंदिरची जागा मराठा महासंघाच्या नावे खोटी कागदपत्रे तयार करून केली असल्याचे नमूद करून करमाळा पोलीसात फिर्याद दिली आहे. या प्रकरणी न्यायालयाच्या आदेशाद्वारे पोलीसांनी यात गुन्हा दाखल केला आहे.

मराठा मंदिरचे प्रशासकीय अधिकारी बीपीन यशवंत मालगुंडकर यांनी सदरची खाजगी फिर्याद करमाळा न्यायालयात दिली होती. त्यात त्यांनी म्हटले आहे, की करमाळा येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालय व करमाळा न्यायालयाच्या मध्यभागी असलेली गट नं.२४३ ही जमीन मराठा मंदिर मुंबई या संस्थेच्या शैक्षणिक उपक्रमासाठी आनंदराव शिंदे यांनी १० एप्रिल १९४७ ला बक्षीसपत्राने दिलेली होती. तेव्हापासून सदरची मिळकत ही मराठा मंदिरच्या मालकी हक्काची व कब्जे वहिवाटीची असून बाजारात तिची किंमत कोट्यावधी रूपयाची आहे. असे असताना यात चौघांनी १९८८ साली महसुल अधिकाऱ्यांशी संगणमत करून सुप्रिडेंट अखिल भारतीय मराठा महासंघ शाखा-सोलापूर अशी नोंद केली. त्यानंतर पुढे या आरोपींनी आपण मालक आहोत हे दाखविण्यासाठी ११ जुन २०१३ ला अधिक्षक सार्वजनिक न्याय नोंदणी कार्यालय सोलापूर यांचेकडे अखिल भारतीय मराठा महासंघ या बनावट संस्थेच्या विश्वस्त नोंदणीबाबत दिलेल्या अर्जामध्ये गट नं.२४३ ही मिळकत आरोपीच्या मालकीची आहे; अशी खोटी व चुकीची माहिती देऊन गंभीर गुन्हा केला आहे.

या प्रकरणी न्यायालयाने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १५६/३ प्रमाणे पोलीसांकडे तपासाकामी पाठविले आहे. यानंतर पोलीसांनी मराठा महासंघाच्या चौघांविरूध्द गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक प्रविण साने हे करत आहेत.

## जेऊर येथील ॲड.शहानूर सय्यद यांचा जागतिक पुरस्काराने गौरव

करमाळा(सं.प्र.) : समाजातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या गुणवान व्यक्ती व संस्थांना सन्मानित करणाऱ्या वर्ल्ड कॉन्स्टिट्यूशन अ‍ॅन्ड पार्लमेंट असोसिएशन म्हणजेच जागतिक संविधान व संसद संघ यांचे वतीने करमाळा वकिल संघाच्या माजी अध्यक्ष ॲड.शहानूर अहमद सय्यद(जेऊर) यांना वर्ल्ड पार्लमेंट इंटरनॅशनल ॲवार्ड २०२३ या जागतिक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सामाजिक कार्याचा




आढावा घेऊन मिळालेले विविध पुरस्कार व बेस्ट ॲडव्होकेट व नोटरी याबाबत ॲड.सय्यद यांना हा पुरस्कार मिळालेला आहे. यासोबतच ॲड.सय्यद यांची डब्लु.सी.पी.ए. च्या मानद कायदेशीर सल्लागार पदी निवड झाल्योची यावेळी जाहीर करण्यात आले. या गुणगौरव सोहळा कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डब्लु.सी.पी.ए. चे प्रेसिडेंट प्रा.नरसिंह मूर्ती हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ गांधीवादी नेते प्रा.ई.पी.मेनन, श्रीरामपूर म.राज्य संपादक मंडळाचे कार्यकारी प्रकाश कुलथे, सामाजिक संगीता जामगे उपस्थित होते.

## वीज वितरण कंपनीची २५ हजाराची चोरी

करमाळा(सं.प्र.) : राज्य वीज वितरण कंपनीची रोशेवाडी येथील डीपीतील ॲल्युमिनियमची वायर व १९० लिटर ऑईल असा २५ हजार २०० रू. चा ऐवजाची चोरी झाली आहे. हा प्रकार २० जुलैच्या अगोदर घडला आहे. या प्रकरणी वीज वितरण कंपनीचे प्रधान तंत्रज्ञ सोमनाथ बळीराम दुधे (रा.पांडे) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की २१ जुलैला सकाळी नऊ वाजता रोशेवाडी येथील लोंढे-मुसळे डिपी बंद असल्याचे कळाले होते. म्हणून मी व माझा हेल्पर मनोहर साळुंके असे सदर डिपीवर गेलो असता डिपीच्या आतील कॉईल व ऑईल हे कोणीतरी चोरून नेल्याचे लक्षात आले. ॲल्युमिनियमची कॉईल साधारणत: ५० किलो व ऑईल १९० लिटर असे २५ हजार २०० रू. चे साहित्य अज्ञात चोरट्याने चोरून नेले आहे. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

## मोटारसायकल अपघातात दांम्पत्य जखमी

करमाळा (सं.प्र.) : रस्त्यावरील मोटारसायकलस्वाराने समोरून जात असलेल्या मोटारसायकलला जोराची धडक देऊन झालेल्या अपघातात पती-पत्नी जखमी झाले आहेत. हा अपघात २५ जुनला सायंकाळी साडेपाच वाजता आळसुंदे-वरकुटे रोडवर घडला आहे. या प्रकरणी २३ जुलैला फिर्याद दाखल झाली आहे. ही फिर्याद शालन श्रीमंत वाघमारे (रा.आळसुंदे) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की २५ जुन २०२३ रोजी सायंकाळी साडेपाच वाजता मी व माझे पती मोटारसायकल क्र.एमएच ४५ एम ८९५५ वरून आळसुंदे-वरकुटे रस्त्याने जात असताना समोरून महादेव गणपत वाघमोडे (रा.सालसे) हा त्याच्या ताब्यातील मोटारसायकल क्र.एमएच १२ एफएच ७३८८ ही भरधाव वेगात विरूध्द दिशेला आला व त्याने आमच्या मोटारसायकलला धडक दिली. त्यात माझ्या हाताला व तर माझ्या पतीच्या पायाला व बरगडीला जखम झाली आहे. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला आहे.



डॉ.संकेत दिलीप कांबळे

हार्दिक अभिनंदन

करमाळा येथील **डॉ.संकेत दिलीप कांबळे** हे बी.जे.मेडिकल कॉलेज, पुणे येथून एम.डी.(मेडिकल) परीक्षेत उत्तीर्ण झाल्याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन व पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा !

**शुभेच्छुक**

**श्री.सतीश गो. शिगची (संजोग सेल्स ॲन्ड सर्व्हिस)**

**श्री.जगदीश गो. शिगची (विमा सल्लागार, एल.आय.सी. एजन्सी)**



सौ.ललिता अभय येवले

कळविण्यात अत्यंत दु:ख होते की..
**सौ.ललिता अभय येवले** यांचे शुक्रवार दि.२१/७/२०२३ रोजी आकस्मिक दु:खद निधन झाले. परमेश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो, ही प्रार्थना व

**भावपूर्ण श्रध्दांजली !**

शोकाकुल
**येवले परिवार** करमाळा, सोलापूर, पुणे, मुंबई

**दशक्रिया विधी : पंढरपूर येथे रविवार दि.३०/७/२०२३ रोजी सकाळी ८.३० वा.**



करमाळा तालुक्याचे विकासप्रिय आमदार

# मा.श्री.संजयमामा शिंदे

आपणांस दि.३१ जुलै रोजी असलेल्या वाढदिवसास हार्दिक शुभेच्छा !

सरपंच, कंदर



श्री.भास्करराव भांगे

सरपंच, चिखलठाण



श्री.चंद्रकांत सरडे

सरपंच, वाशिंबे



श्री.तानाजी(बापू) झोळ

शुभेच्छुक

- ग्रामपंचायत कंदर व ग्रामस्थ
- ग्रामपंचायत चिखलठाण व ग्रामस्थ
- ग्रामपंचायत वाशिंबे व ग्रामस्थ